# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२९/१०/२०१८

## दि.२९/१०/२०१८ रोजी दु.१२/०० वा.ते २१/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७७७/१८,भादविक ३०२,५०४, |
| **फिर्यादी** | अे.डी. साबळे, पो.उप.निरी.येरवडा पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | दुर्गेशनाथ गोपीनाथ गोसावी, वय २९ वर्षे,रा.दत्तमंदिर चौक, लोहगाव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/१०/२०१८ रोजी पहाटे ०५/३० वा.चे पुर्वी संगमवाडीकडुन, सादल बाबा चौकाकडे जाणाऱ्या रोडचे पश्चिमेस ओढयाच्या पुला जवळ,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम दुर्गेशनाथ गोपीनाथ गोसावी, याचेकडे पुर्वी फर्निचरचे काम केलेला, यातील मयत इसम नामे- नरसिंगराम बुटाराम गर्ग, वय ३७ वर्षे,रा.बुधवार पेठ,पुणे मुळ रा. राजस्थान, याने दुर्गेशनाथ याचेकडे फर्निचर कामाचे दोन हजार रुपयाची वेळोवेळी मागणी केली तसेच नरसिंगराम गर्ग याने दि.२८/१०/२०१८ रोजी रात्रौ दुर्गेशनाथ याचेकडे पैशाची मागणी केल्याने त्यास हजार रुपये देण्यासाठी दुर्गेशनाथ हा स्वतःचे मोटार सायकलवरुन बुधवार पेठ, येथे जावुन हजार रुपये नरसिंगराम यास दिले व ते दोघे दारु पिल्यानंतर दोघे मिळुन मोटार सायकल वरुन लोहगावकडे येत असताना, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, रोडच्या बाजुस दुर्गेशनाथ हा लघुशंकेसाठी थांबला असताना, नरसिंगराम तेथे गेला असता, दुर्गेशनाथ याने नरसिंगराम यास शिवीगाळ करुन, त्यास लाथ मारुन खाली पाडल्यावर त्याचे डोक्यात सिमेंट ब्लॉक डोक्यात मारुन जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) किरण बालवडकर ८८३०७१३१०३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ५६४/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | आकाश ढावरे, वय २४ वर्षे,रा.धायरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/१०/२०१८ रोजी सकाळी १०/०० वा.ते दुपारी १२/०० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.३०२ तिसरा मजला, हरेहरेश्वर कॅम्प्लेक्स लायगुडे वस्ती, साई धाम धायरी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील लॉकरमधुन सोन्याचे दागिने एकुण २ लाख ४३ हजार रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.पडवळ ९६८९५५२५०१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**